Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 19 January 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १० जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

********

- संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा, असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं 'मन की बात'मध्ये आवाहन
- भारतानं अंतराळ क्षेत्रात केलेल्या ऐतिहासिक कामगिरीविषयी पंतप्रधानांचे गौरवोद्गार
- स्वित्झर्लंडमधील दाओसमध्ये होणार विविध क्षेत्रासंबंधी सामंजस्य करार

आणि

- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील संशोधक प्राध्यापक डॉक्टर राजाराम माने आणि सहकाऱ्यांच्या संशोधनाला अमेरिकेतील पेटंट

********

संविधान सभेत झालेल्या चर्चा, सदस्यांनी मांडलेले विचार, हा आपला सर्वात मोठा वारसा असून संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा, असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहिलं पाहिजे, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज 'मन की बात' कार्यक्रमातून केलं. भारतादाच्या प्रजासत्ताकाचा ७५ वा वर्धापन दिन असल्यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी संविधान सभेत मांडलेल्या विचारांचं ध्वनिमुद्रण पंतप्रधानांनी श्रोत्यांना ऐकवलं. ते म्हणाले –

> ***जब संविधान सभा ने अपना काम शुरू किया, तो बाबासाहब आंबेडकर ने परस्पर सहयोग को लेकर एक बहुत महत्वपूर्ण बात कही थी।***

*"Our difficulty as I said is not about the ultimate future. Our difficulty is how to make the heterogeneous mass that we have today, take a decision in common and march in a cooperative way on that road which is bound to lead us to unity."*

*ये audio डॉ. राजेंद्र प्रसाद जी का है –*

*"हमारी जिंदगी और संस्कृति में कुछ ऐसा है जिसने हमें समय के थपेड़ों के बावजूद जिंदा रहने की शक्ति दी है | अगर हम अपने आदर्शों को सामने रखे रहेंगे तो हम संसार की बड़ी सेवा कर पाएंगे |"*

येत्या २५ जानेवारीला राष्ट्रीय मतदार दिन असल्याचं सांगून, नागरिकांनी वेळोवेळी आपला मताधिकार बजावत लोकशाही प्रक्रियेचा भाग व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था–इस्रोनं अंतराळात दोन उपग्रह परस्परांशी जोडण्याचा यशस्वी प्रयोग तसंच भारतीय अंतराळ तंत्रज्ञान 'स्टार्ट–अप' कंपनीकडून देशातल्या पहिला खाजगी उपग्रहाचं यशस्वीरित्या प्रक्षेपणाचा गौरवपूर्ण उल्लेख पंतप्रधानांनी केला. 'स्टार्ट अप इंडिया' योजनेला ९ वर्ष पूर्ण झाल्याचं स्मरण पंतप्रधानांनी करून दिलं. या काळात देशात निर्माण झालेले अर्ध्यापेक्षा जास्त 'स्टार्ट अप' मध्यम आकाराची 'टियर २' शहरं आणि लहान आकाराची 'टियर ३' अशा शहरांमधले आहेत, असं सांगून ते म्हणाले, यातून आपली 'स्टार्ट अप' संस्कृती केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित राहिलेली नाही, हेच दिसून येतं.

याबाबत त्यांनी वाशिमसह देशातल्या इतर काही शहरांचं उदाहरण दिलं. छोट्या शहरांमधले अर्ध्यापेक्षा जास्त 'स्टार्ट अप' मुली चालवतात, असंही त्यांनी कौतुकानं सांगितलं.

यंदाच्या कुंभमेळ्यात युवा वर्गाचा मोठा सहभाग असल्याचा उल्लेख करुन त्यांनी समाधान व्यक्त केलं. देशाच्या विविध भागातले उत्सव– परंपरा आणि कुंभमेळा यांचा संबंध त्यांनी स्पष्ट केला. हा कुंभमेळा डिजीटल माध्यमांतून जागतिक स्तरावर लोकप्रिय ठरत असून त्याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे, असं ते म्हणाले.

येत्या २३ जानेवारीला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीदिनी आपण पराक्रम दिवस साजरा करणार असल्याची आठवण त्यांनी श्रोत्यांना करुन दिली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याला उजाळा देतानाच बोस यांच्या घराला भेट दिल्याचा अनुभव त्यांनी श्रोत्यांना ऐकवला. देशात वन्यजीवांच्या संवर्धन आणि सहकार्यासाठी होत असलेल्या, तसंच महिला बचत गटांच्या प्रेरणादायी यशोगाथाही पंतप्रधानांनी आजच्या ‘मन की बात’ मधून श्रोत्यांना ऐकवल्या.

****

स्वित्झर्लंडमधल्या दाओस इथं उद्यापासून सुरु होणाऱ्या, जागतिक आर्थिक मंच २०२५ मध्ये केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात ते देशाच्या विकास आराखड्याची माहिती देतील. पाच दिवसांच्या जागतिक आर्थिक मंच कार्यक्रमात, समावेशक विकास तसंच सामाजिक, भौतिक आणि डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक आणि तंत्रज्ञानाचं लोकशाहीकरण या मुद्यांवर व्यापक चर्चा केली जाईल, असं वैष्णव यांनी म्हटलं आहे. भारताचं आर्थिक धोरण, डिजिटल संरचना तसंच समाजाच्या सर्व घटकांना सक्षम बनवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर याबाबत जाणून घेण्यासाठी जग उत्सुक असल्याचं ते म्हणाले. या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री उदय सामंत रवाना झाले आहेत. या दौऱ्यात डाटा केंद्रं, स्वयंचलित वाहनं, सेमीकंडक्टर, विद्युत वाहनं, इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधं आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात मोठ्या संख्येनं सामंजस्य करार केले जाणार आहेत.

****

बॉलीवुड अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला प्रकरणी मुख्य संशयिताला मुंबई पोलिसांनी ठाण्यातून अटक केली असून त्याला न्यायालयानं ५ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. त्यानं आधी आपलं नाव विजय दास असं सांगितलं होतं, पण पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर मोहम्मद शरीफ इस्लाम शहजाद असं त्याचं खरं नाव समोर आलं. प्राथमिक पुरावे आणि त्याच्याकडे आढळलेल्या काही गोष्टींवरून तो बांग्लादेशचा नागरिक असल्याची शक्यता मुंबई गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त दीक्षित गेडाम यांनी आज वार्ताहर परिषदेत वर्तवली. हा संशयित चोरीच्या उद्देशानं सैफ अली खानच्या घरात घुसल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

नांदेड जिल्ह्यातल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील संशोधक प्राध्यापक डॉक्टर राजाराम माने आणि डॉक्टर झोयेक शेख यांच्या गटानं केलेल्या संशोधनाला अमेरिकेतील कायदेशीर हक्क – पेटंट प्राप्त झालं आहे. या विद्यापीठाचे हे असे नवीन शोधावर मिळालेले पहिले कायदेशीर हक्क आहेत. या संशोधनाद्वारे मानवी मूत्रापासून कार्बन पदार्थांची निर्मिती करुन त्याचा वापर ऊर्जा निर्मितीसाठी करण्यात येत आहे. या शोधाच्या माध्यमातून प्रा. डॉ. माने आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एक अभिनव पद्धतीने ऊर्जा निर्माण करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. तयार केलेल्या पदार्थांचा वापर हायड्रोजन निर्मितीसाठी करण्यात आला असल्याची माहिती विद्यापीठातर्फे देण्यात आली आहे. या संशोधनासाठी किंग साउद विद्यापीठाचे सहयोग महत्त्वपूर्ण ठरले असल्याचंही विद्यापीठानं म्हटलं आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी डॉ. माने आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं या यशाबद्दल अभिनंदन केलं आहे.

****

बीड तालुक्यातल्या घोडका राजुरी गावाजवळ आज सकाळी एसटी बसची धडक लागून तीन युवकांचा मृत्यू झाला. ही घटना अत्यंत दुःखद असून मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत देण्याचे निर्देश एसटी प्रशासनाला दिले असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. शासनातर्फे मृतांच्या कुटुंबीयांना जी मदत करणं शक्य होईल, ती करण्यास तत्पर असल्याचंही मंत्री सरनाईक यांनी सांगितलं. सकाळच्या धुक्यामुळं धावण्याचा सराव करणारे युवक दिसले नाहीत, असं चालकाचं म्हणणं आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या केज तालुक्यातील मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ तसंच परभणी इथं कोठडीत निधन झालेले सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळावा या मागणीसाठी आज छत्रपती संभाजीनगर इथं जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मराठा आंदोलन नेते मनोज जरांगे पाटील, माजी खासदार इम्तियाज जलील यांसह मोठा जनसमुदाय सहभागी झाला होता. आपण देशमुख कुटुंबीयांच्या बरोबर आहोत, पूर्ण ताकदीनं न्याय मागण्यासाठी लढा देऊ असं जलील यावेळी म्हणाले. देशमुख यांची हत्या करणाऱ्याला योग्य ती शिक्षा मिळेपर्यंत शांत बसणार नसून पूर्ण ताकदीनं हा लढा लढण्याचा संकल्प करण्याचं आवाहन विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी यावेळी

केलं. देशमुख आणि सूर्यवंशी कुटुंबाचे सदस्य तसंच उपस्थितांतर्फे विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये या संदर्भातल्या मागण्यांचं निवेदन सादर करण्यात आलं.

****

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी इथल्या जिल्हा परिषदेच्या मैदानावर आज शासकीय सेवा आणि योजनांचा महामेळावा तसंच अंमलबजावणी महाशिबीर घेण्यात आलं. या कार्यक्रमाचं उद्धाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा जिल्हा पालक न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आलं. समाजातल्या दुर्बल आणि वंचित घटकांचं सक्षमीकरण तसंच त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी हा महामेळावा घेण्यात आला असल्याचं, न्यायमूर्ती सूर्यवंशी यांनी सांगितलं. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आदिवासी लाभार्थ्यांना विविध लाभांचं वाटप करण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आयोजित अजिंठा वेरुळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आज समारोप होत आहे. या समारोप सोहळ्यात सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा सुवर्ण कैलास पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या सर्व पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दर शनिवारी नागरिकांच्या तक्रार निवारण्याकरिता पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी विशेष मोहीम राबवण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार काल या मोहिमेत ४१० अर्ज निकाली काढण्यात आले. यात स्थानिक ३५ आणि वरिष्ठ ३७५ अर्जांचा समावेश होता.

****

बीड जिल्ह्यातील तबलीग जमातचे प्रमुख सय्यद नजीब मौलाना सहाब यांच्या पार्थिव देहावर आज दफनविधी करण्यात आला. सय्यद नजीब यांचं काल अल्पशा आजारानं निधन झालं. शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला.

****